# महासागर
# नागपूर वृत्तसागर

बुधवार, दि. १६, जुलै २०२५


## रोजगार गॅरंटी योजनेमध्येही बोगस प्रस्ताव

**संघटनेच्या अध्यक्षावर गुन्हा दाखल**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

बोगस शिक्षक भरती प्रस्ताव प्रकरण अजूनही ताजे असतानाच रोजगार गॅरंटी योजनेतही श्रमिकांचे बोगस कागदपत्र तयार करून माल कमावण्याचा नवा फंडा पुढे आला आहे. या प्रकरणी अजनी पोलिसांनी एका संघटनेच्या अध्यक्षाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. अजयकुमार एस. नाखले असे आरोपीचे नाव आहे.

नाखले हा 85 प्लॉट एरिया परिसरातील राष्ट्रीय गवंडी कामगार संघटनेचा अध्यक्ष आहे. फिर्यादी रिना अनंता पोराटे रा. सिंधी, वर्धा ह्या महाराष्ट्र सरकारच्या कामगार विभागात दुकान निरीक्षक आहेत. त्यांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी महामंडळाच्या दक्षता समितीतही सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीचे काम बोगस प्रस्ताव आणि दलाली करणाऱ्यांची चौकशी करणे आहे. दरम्यान अतिरिक्त कामगार आयुक्त नागपूर कार्यालयाला माहिती मिळाली की, राष्ट्र संघर्ष गवंडी कामगार संघटनेचा अध्यक्ष नागपूरच्या अधिकृत अधिकाऱ्यांच्या नावाने बनावट स्वाक्षऱ्या आणि शिक्के वापरून 90 दिवस काम करणाऱ्या कामगारांचे बनावट प्रस्ताव तयार करत असल्याचे आणि ते इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या वेबसाइटवर अपलोड करत आहे. कामगार आयुक्तांच्या आदेशानुसार, रिना पोराटे आणि त्यांच्या पथकाने नाखलेच्या कार्यालयावर धाड टाकली. तपासणी दरम्यान, तेथे कळमेश्वर तहसीलच्या मोहगाव ग्रामपंचायत समितीने तयार केलेले ए-46 अर्ज, हिंगणा तहसीलच्या वडगाव गुजर पंचायत समितीने तयार केलेले 3 अर्ज आणि 2 कोरे अर्ज प्रस्ताव आढळून आले.

# मैत्रेय ग्रुपवर गृहराज्यमंत्र्यांची निर्णायक कारवाई

### २५०० कोटींचा घोटाळा ठेवीदारांना ८-९ महिन्यांत दिलासा?



गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या प्रकरणांमध्ये तातडीने कारवाई होण्यासाठी राज्य सरकार स्वतंत्र तपास यंत्रणा उभारणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. फसवणूक प्रकरणातील शिक्षेच्या स्वरूपाबाबतही बदल करून अधिकाधिक कठोर कारवाई करण्यासाठी शिक्षेची मुदत वाढ आणि दंडाची रक्कम वाढवण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याचा विचार केला जाईल, असेही फडणवीस यांनी सांगितले. फसवणूक प्रकरणी गुन्हा नोंदवला गेल्यानंतर संबंधित मालमत्ता शोधणे, तिचे मूल्यांकन करणे, जप्तीची प्रक्रिया राबवणे आणि विक्री करणे या सर्व टप्प्यांमध्ये पोलिसांना ही यंत्रणा सहकार्य करेल तसेच महाराष्ट्र संरक्षण धोका गुंतवणूकदार संरक्षण (एमपीआयडी )कायद्यांतर्गत कारवाई अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न आहे. एमपीआयडी कायद्याच्या अंतर्गत मालमत्ता जप्त करून ती लिलावात विक्रीसाठी आणता येते. मात्र या प्रक्रियेत आजवर फार कमी प्रमाणात यश मिळाले आहे. अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उपयुक्त ठरेल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

महाराष्ट्रातील सुमारे २५०० कोटी रुपयांचा मैत्रेय ग्रुप घोटाळा अखेर निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. हजारो ठेवीदारांची फसवणूक करणाऱ्या मैत्रेय प्लॉट्स अँण्ड स्ट्रक्चर्स प्रा. लि. आणि मैत्रेय सुपरस्ट्रक्चर्स प्रा. लि. या कंपन्यांविरोधात गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या पुढाकाराने शासनाने ठोस पावले उचलली आहेत.

मागील महिन्यात मंत्रालयात गृहराज्यमंत्री कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीनंतर आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात या प्रकरणावर चर्चा झाली.

मंत्री कदम यांनी सविस्तर उत्तर देताना सांगितले की, मैत्रेय ग्रुपकडून २९ लाख ८७ हजार ४२२ गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आली असून, या प्रकरणात ३१ गुन्हे दाखल झालेत तर ५६ आरोपींवर कारवाई सुरू आहे . मैत्रेय ग्रुपच्या ४०९ मालमत्ता जप्त करण्यात आल्या असून, त्यापैकी ७० मालमत्तांचे मूल्यांकन पूर्ण झाले आहे, ज्यांची किंमत २५० कोटी रुपए आहे. विशेष म्हणजे, ३६० मालमत्तांच्या मूल्यांकनासाठी न्यायालयाने परवानगी दिली आहे, तर इतर राज्यांतील सुमारे १००० हून अधिक प्रॉपर्टीची माहितीही गोळा केली जात आहे.

गृह राज्यमंत्री कदम यांनी सांगितले की, कोर्टाच्या आदेशानुसार संपूर्ण लिलाव प्रक्रिया पूर्ण करून पुढील ८-९ महिन्यांत गुंतवणूकदारांना पैसे देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. ठेवीदारांचे हित हेच शासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देणे हीच शासनाची भूमिका आहे, असे मंत्री कदम यांनी ठामपणे स्पष्ट केले.

या प्रकरणात पोलिस, आर्थिक गुन्हे शाखा, आर्थिक गुन्हे नियंत्रण विभाग, न्यायालय आणि राज्य शासन यांचे समन्वयाने काम सुरू असून हजारो कुटुंबांचे भविष्य अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी हा निर्णय निर्णायक ठरणार आहे, असे म्हटले जात आहे.

मैत्रेय ग्रुपने राज्यभरात शाखा उघडून एजंटांची मोठी फळी निर्माण केली होती. त्यांच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना आकर्षिक करण्यात आले. गुंतवणूकदारांकडून जमा केलेल्या सुमारे २५०० कोटी रूपयातून ठिकठिकाणी मालमत्ता खरेदी करण्यात आल्या. दरम्यान, काही महिन्यांपूर्वीपर्यंत नागपूर येथील सीताबर्डी भागातील एका मॉलमध्ये आर्थिक गुन्हे शाखेने या भागातील गुंतवणूक दारांचा रेकॉर्ड तपासण्याचे व आवश्यक कागदपत्र गोळा करण्याचेही काम केले होते. आता सभागृहात गृहराज्यमंत्र्यांनी निवेदन केल्याने गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळण्याची आशा बळावली आहे.

## नागपुरात स्पा आडून देहव्यवसायाचा पर्दाफाश




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ११ :

नागपूर शहर आता बेकायदेशीर कृत्यांचा अड्डा बनत चालले आहे. शहराचा मध्यवर्ती आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांमुळे गजबजलेला सीताबर्डीचा परिसर देहव्यवसायाचेही केंद्र बनत आहे. गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा पथकाने सीताबर्डीच्या मुख्य बाजारपेठेतल्या मेट्रो स्पा अँड वेलनेस सेंटरवर छापा टाकत या देहव्यवसायाचा भंडाफोड केला. स्पा च्या आडून या ठिकाणी महिलांचा बाजार मांडला जात असल्याचे उघड झाले असून हा अड्डा चालविणारीही महिलाच आढळली आहे. सामाजिक सुरक्षा पथकाने येथून चार पिडीत महिलांची सुटका केली.

आरती अक्षय मरसकोल्हे ही गोपालनगरातील महिला या स्पा मध्ये देहव्यवसायासाठी महिलांना जागा उपलब्ध करून देत होती. गेल्या अनेक दिवसांपासून सिताबर्डीच्या मुख्य बाजारपेठेत ती स्पाच्या आडून हा गोरखधंदा चालवत होती. सामाजिक सुरक्षा पथकाने या स्पा मधून चार तरुणींची सुटका केल्यानंतर आरोपी आरती मरसकोल्हेला ताब्यात घेऊन सिताबर्डी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

सामाजिक सुरक्षा पथकाने गेल्या काही दिवसांपासून देहव्यसायाविरोधात मोहिम उघडली आहे. यात आणखी एक धक्कादायक माहिती उजेडात येत आहे. देह व्यवसायाचे हे अड्डे चालविणाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण अधिक आहे. महिलाच महिलेकडून देहव्यवसाय करून घेतात हे समोर येत आहे.

सेंट्रल एव्हेन्यूवरील लॉजवर छापा टाकत पोलिसांनी काही दिवसांपूर्वी उजबेकिस्तानच्या पिडीतेची सुटका केली होती. या प्रकरणातली आरोपी महिला फरार झाली. त्यानंतर कोराडीत उच्चभ्रू वसाहतीतून पोलिसांनी तरुणाला सोडवत एका महिलेला अटक केली. त्या पूर्वीही वाठोडातल्या सरगम लॉजवर छापा टाकत पथकाने दोन पिडीतांची सुटका केली होती. त्रिमुर्तीनगर चौकातील मुस्कान वर्षा अपार्टमेंटच्या दुसऱ्या माळ्यावरील ओरीयन स्पावर छापा टाकत दोन तरुणींची सुटका करण्यात आली होती. हा अड्डाही एक महिला चालवत होती. या सगळ्या घटनांमध्ये महिलाच महिलेकडून देह व्यवसाय करून घेत असल्याचे उघड झाले आहे.

## दिल्लीचे चेन स्नॅचर अडकले जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

सोनसाखळी पळविणाऱ्या दिल्लीतील टोळीच्या नागपूर पोलिसांनी मुसक्या आवळल्या. ट्रॉजिस्ट रिमांडवर त्यांना अटक करून नागपुरात आणले. न्यायालयाने त्यांना 17 जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. अक्षय शर्मा (29), रोहीतकुमार (27) आणि रोहित गुप्ता सर्व रा. दिल्ली अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. आरोपींचे दोन साथीदार फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. रोहित गुप्ता हा सराफा व्यापारी असून त्याने आरोपींकडून चोरीच्या सोनसाखळी खरेदी केल्या. त्यामुळे पोलिसांनी गुप्तालाही आरोपी बनविले आहे.

आरोपी मुळचे दिल्लीचे आहेत. त्यांच्यावर दिल्लीत अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. त्यांचा एक मित्र मुळचा वर्धा जिल्ह्यातील आहे. तो दिल्लीला शिकायला गेला. तेव्हा आरोपींशी त्याची ओळख झाली. नंतर तो सुद्धा आरोपींच्या टोळीत सहभागी झाला. त्याच्या मदतीने आरोपींनी चोरीसाठी नागपूर शहराची निवळ केली. त्यांनी धंतोली, सीताबर्डी, अजनी, सदर आणि ग्रामीण भागातही धुमाकूळ घातला. जवळपास साडेसात तोळे सोनसाखळी पळविली. सराफा व्यापाऱ्याला विक्री केली. मिळालेल्या पैशांवर मनसोक्त भोजनाचा आस्वाद घेतला. नवीन कपडे खरेदी केली. मौजमस्ती करीत होते.

अक्षय आणि रोहित हे पहिल्यांदा फेब्रुवारी महिन्यात नागपुरात आले. तेलंगाना एक्स्प्रेसने नागपूर रेल्वे स्थानकावर आल्यानंतर वर्धेचा साथीदार व त्याच्या मित्राची मदत घेतली. त्याला नागपूरची संपूर्ण माहिती होती. त्याच्या मदतीने तिघांनी ठिकठीकाणी लुटपाट केली. तो मोटारसायकल चोरी करायचा. चोरीच्या मोटारसायकलवर ते सोनसाखळी लुटायचे.

## १७ वर्षीय तरुणीची गळफास लावून आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १५ :

नीट परीक्षेची तयारी करीत असलेल्या एका१७ वर्षीय तरुणीने बेडरूममध्ये पंख्याला साडीने बांधून गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना वानाडोंगरी येथील मंगलमूर्ती कॉलनीत सोमवारी (१४)रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली. आत्महत्येमागील कारण अद्याप कळू शकले नाही. मात्र या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. वैदेही अनिल उईके (वय १७)असे तरुणीचे नाव असून तिचे वडील अनिल उईके हे नागपूर शहर पोलीस दलात नोकरीत आहे. तिची मोठी बहीण एमबीबीएस पदवी शिक्षण घेत आहे .वैदेही ने यावर्षी "नीट "ची परीक्षा दिली होती पण तिला स्कोर कमी आल्याने ती पुन्हा या परीक्षेच्या तयारीसाठी "अलेन ट्युशन अकॅडमी मध्ये शिक्षण घेत होती. सोमवारी ती नेहमी प्रमाणे ट्युशन ला गेली व सायंकाळी ७ वाजता वानाडोंगरी येथील घरी पोहचली. दरम्यान तिचे आई जयश्री व वडील अनिल दोघेही सोबत बाहेर गेले होते. ते सुद्धा काही वेळा त घरी पोहचले. त्यावेळी वैदेहीची प्रकृती त्यांना बिघडलेली दिसली .त्यामुळे आईवडील सायंकाळी ७ वाजता तीला नजीकच्या शालिनीताई मेघे रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेले. डॉक्टरांनी तपासून मानसिक तणावामुळे प्रकृती बिघडली असल्याचे सांगितले. त्यानंतर प्राथमिक उपचार घेऊन ती आईवडिलांसह रात्री ११ वाजता घरी परतली. त्यानंतर कपडे बदलण्यासाठी बेडरूममध्ये जात असल्याचे आईला सांगून ती आत गेली. बराच वेळ बेडरूममधून बाहेर आलीच नाही. वडिलांनी किरायदारांना बोलावून बेडरूमचे दार तोडून आत प्रवेश केला. तर वैदेही त्यांना पंख्याला लटकलेल्या अवस्थेत दिसली. तिला खाली उतरविले. तर ती मृत पावली होती. याची माहिती एमआयडीसी पोलिसांना देण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक महेश पवार व स्टाफ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास ठाणेदार गोकुल महाजन यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक किशोरी माने करीत आहेत.

## वीज बिल भरा अन् अतिरिक्त उत्पन्न मिळवा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

वीज बिल भरणा अधिक सुलभ करण्यासोबतच आता अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याचीही संधी महावितरणने उपलब्ध करून दिली आहे. महावितरणने स्वतःचे अत्याधुनिक पेमेंट वॉलेट महापॉवरपे सुरू केले असून, यामुळे वीज ग्राहकांना बिल भरणे अधिक सोपे झाले आहे, तर 18 वर्षांवरील कोणताही व्यक्ती या वॉलेटचा वापर करून प्रति बिल पावतीमागे 5 रुपये कमिशन मिळवू शकतो. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही एक उत्तम संधी असून, बेरोजगार तरुण, छोटे व्यावसायिक आणि बचत गटही या योजनेचा लाभ घेऊन आत्मनिर्भर होऊ शकतात.

असे व्हा महावितरणचे 'वॉलेटधारक' आणि मिळवा उत्पन्नः महावितरणचे वॉलेटधारक होण्यासाठी काही सोप्या अटी आहेत. 18 वर्षांवरील कोणतीही व्यक्ती आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करू शकते. यात आधार कार्ड, पॅन कार्ड, गुमास्ता प्रमाणपत्र, पत्त्याचा पुरावा, पासपोर्ट फोटो, रद्द केलेला धनादेश, वीजेचे बिल आणि भाडेकरूंसाठी भाडे करारनामा यांसारख्या प्रतींसह महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात अर्ज करणे आवश्यक आहे.

ऑनलाइन नोंदणीचीही सोयः तुम्ही या महावितरणच्या संकेतस्थळाला भेट देऊन आवश्यक कागदपत्रे अपलोड करून ऑनलाइन नोंदणी करू शकता. याशिवाय, महावितरणचे महा पॉवर पे ॲप गुगल प्ले स्टोअरमधून डाउनलोड करू शकतात. यासाठी ॲपवर नोंदणिसाठी मदत देखील उपलब्ध आहे. ॲपमध्ये नोंदणी करून तुमचा मोबाईल नंबर आणि इतर आवश्यक माहिती भरा. अर्जदारांच्या अर्जाची आणि जागेची पडताळणी संबंधित उपविभागीय कार्यालयाकडून विनाशुल्क केली जाते. ही माहिती मुंबई कार्यालयाला पाठवल्यानंतर अर्जांना मंजुरी मिळते. एकदा ऑनलाइन नोंदणी झाल्यावर तुम्ही तब्बल 99 ठिकाणी लॉग-इन करून वीज देयके स्वीकारू शकता. किंवा वॉलेटमधील शिल्लक रकमेतून तुम्ही तुमचे वीजबिल भरू शकता.

वॉलेट रिचार्ज आणि कार्यप्रणालीः महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर तुम्हाला किमान 5 हजार रुपयांचे वॉलेट रिचार्ज करावे लागते. त्यानंतर एक हजार रुपयांच्या पटीत तुम्ही रिचार्ज करू शकता. डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड आणि ऑनलाइन बँकिंगद्वारे वॉलेट रिचार्ज करण्याची सोय उपलब्ध आहे.

वॉलेटधारक महावितरणच्या ॲपमध्ये नोंदणी करून ग्राहकांकडून वीज बिल स्वीकारू शकतात. बिल भरणा झाल्यानंतर संबंधित ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाईलवर तात्काळ एसएमएस मिळाल्याने ग्राहकांचे जागेवरच समाधान होते. एकाच वॉलेटचा बॅलेन्स वापरून विविध लॉग-इनद्वारे वेगवेगळ्या व्यक्तींकडून वीज बिल भरून घेण्याची सोयही या वॉलेटमध्ये देण्यात आली आहे.

महावितरण वॉलेटचे फायदेः ग्राहक त्यांच्या मोबाईल किंवा इतर उपकरणांच्या मदतीने कधीही आणि कुठेही वीजबिल भरू शकतात. छोटे व्यावसायिक, जसे की किराणा दुकानदार, ॲपमध्ये वीजबिल भरणा आणि इतर व्यवहारांची माहिती उपलब्ध असल्याने, वापरकर्त्यांना व्यवहारांमध्ये पारदर्शकता मिळते.

## वीज कंत्राटी कामगारांची
### मुख्यमंत्री फडणवीस यांना मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

महावितरण महानिर्मिती व महापारेषण कंपनी अंतर्गत कार्यरत हजारो वीज कंत्राटी कामगार हे अनेक ठिकाणी ११ केव्ही, २२ केव्ही विद्युत वाहिनीवर दुरुस्ती, देखभाल, मेंटेनन्स व तत्सम अत्यंत धोकादायक काम करीत असतात.

या कामकाजामध्ये अपघातांचा व जीवित हाणीचा संभाव्य धोका सदैव असतो. सध्या राज्यातील हजारो वीज कंत्राटी कामगार ई एस आय सी योजनेच्या बाहेर गेलेले आहेत कारण त्यांचे मासिक वेतन रुपये २१,००० च्यावर गेले आहे. अशावेळी त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांनाही वैद्यकीय उपचारांपासून वंचित राहावे लागते, जे सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय गंभीर बाब आहे. या संघटनेच्या वतीने ठोस उपाययोजना त्वरित करण्यात याव्यातः

ई एस आय सी मर्यादा ओलांडल्यानंतर संबंधित कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी किमान १० लाख रुपये पर्यंतची मेडिक्लेम पॉलिसी तातडीने लागू करण्यात यावी. जेणे करून आपत्कालीन प्रसंगी कॅशलेस हॉस्पिटलायझेशनची सुविधा सर्व संबंधित कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना तत्काळ उपलब्ध होईल.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री याबाबत सहानुभूतीपूर्वक व तातडीने निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी. यासाठी कामगारांची बैठक रेशिमबाग मैदान येथे संघटनेच्या पदाधिकारी समवेत पार पडली. यावेळी संघटनेचे सचिव अभिजित माहुलकर, कोषाध्यक्ष योगेश सायवनकर, कार्याध्यक्ष सागर साबळे, संघटन मंत्री सुकेश गुरवे, अध्यक्ष समीर हांडे उपस्थित होते. अशी मागणी प्रसिद्धी पत्रकाद्वारे अभिजीत माहुलकर यांनी दिली.

## चाकूच्या धाकावर गुंडाचा हैदोस

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

पाचपावली पोलिसांनी गस्तीदरम्यान एका गुंडाला सार्वजनिक ठिकाणी शस्त्राचा धाक दाखवून हैदोस घालताना अटक केली. अनीस अहमद इकबाल अहमद (47) रा. रमाबाईनगर, पाचपावली असे अटकेतील गुंडाचे नाव आहे.

सोमवारी रात्री 9.30 वाजताच्या सुमारास पाचपावली पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान वैशालीनगरातील आंबेडकर उद्यानाजवळ एक व्यक्ती शस्त्राचा धाक दाखवून हैदोस घालत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस परिसरात पोहोचले. अनीस लोकांना शिविगाळ करून धमकावताना दिसला. पोलिसांनी घेराबंदी करून अनीसला ताब्यात घेतले. त्याच्याजवळून चाकू जप्त केला. मनाई आदेशाचे उल्लंघन आणि आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून त्याला अटक केली.

## १.९५ लाखाच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात आरोपीने रोकड आणि चांदीच्या वस्तूंसह एक लाख 95 हजार रुपये किंमतीच्या मुद्देमालावर डल्ला मारला. ही घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी प्रशांत नामदेव पवार (42) यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे.

प्रशांत यांची बहीण विद्या रमेश बेंडे ही बेलतरोडी ठाण्यांतर्गत रुख्मिणी कृष्णा अपार्टमेंट येथे राहते. विद्याचे पती नोकरीनिमित्त पुणे येथे राहतात. गत 13 जुलैच्या सायंकाळी विद्या घराला कुलूप लावून पतीकडे पुणे येथे गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने फ्लॅटच्या मुख्य दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटात ठेवलेली 1.10 लाखाची रोकड, चांदीच्या वस्तू चोरी केल्या.

विद्या यांच्या घरी सीसीटीव्ही कॅमेरे लागले आहेत. जाता-जाता चोरटा सीसीटीव्हीचे डीव्हीआरही घेऊन गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी शेजाऱ्याला विद्या यांच्या घराचे दार उघडे दिसले. संशय आल्याने त्यांनी विद्याला याबाबत माहिती दिली. विद्या यांनी भाऊ प्रशांत यांना घरी जाऊन तपासण्यास सांगितले. चोरी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर प्रशांतने घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## मध्य नागपुरात दादांच्या राष्ट्रवादीला भगदाड
### अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत पुढील पाच-सहा महिन्यात होण्याची शक्यता असून वेगवेगळ्या पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते विविध पक्षात प्रवेश करत असल्याचे दिसून येत आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला नागपूर शहरात मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादीचे मध्य नागपुरातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते काँग्रेसमध्ये सामील झाले आहेत.




मध्य नागपूर राष्ट्रवादी काँग्रेस (अजीत पवार) चे अध्यक्ष रवी पराते यांच्यासह सुमारे १०० पदाधिकारी, कार्यकर्ते माजी नगरसेवक रमेश पुणेकर यांच्यावर विश्वास ठेवून काँग्रेस पक्षात आले आहेत. एका कार्यक्रमात शहराध्यक्ष व आमदार विकास ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रदेश महासचिव अतुल कोटेचा, प्रदेश सचिव कमलेश समर्थ, प्रशांत धवड, शहर उपाध्यक्ष प्रा.दिनेश बानाबाकोडे, बसीम खान, ॲड. अभय रणदिवे, आप्पा मोहीते यांच्या प्रमुख उपस्थितीत शहर काँग्रेस कार्यालयात झालेल्या सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजीत पवार) गटाचे मध्य नागपूरचे अध्यक्ष रवी पराते यांनी १०० पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षाच्या विचारधाने प्रेरित होवून शहर अध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांच्या हस्ते काँग्रेस पक्षाचा दुपटटा स्वीकारुन काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तसेच रवी पराते यांनी आपला सखोल राजकीय आणि सामाजिक कार्याच्या अनुभवातून भविष्यात मध्य नागपूर तसेच शहर काँग्रेसचे संघटन अधिक मजबूत करण्याकरिता कार्य करण्याचा मानस व्यक्त करुन निर्धार केला.

यावेळी शहर अध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांनी सांगितले काँग्रेस पक्ष हा महात्मा गांधीच्या काळापासून असून या देशाला स्वतंत्र मिळून देण्याकरीता मोलाचे योगदान दिलेले आहे. तसेच नवीन पिढीची दिशाभूल करुन २०१४ पासून भाजपची एक हाती सत्ता असून देखील काँग्रेसची मताधिक्य वाढलेले आहे.

अनेक वस्त्यामध्ये पानी, दिवे, गडर लाईन यांची दुरावस्था आहे. सरकारी पैशाचा जनसामान्याच्या गरजेच्या गोष्टीकरीता खर्च केला असता तर नागपूरचे चित्र वेगळे असते. समोर नागपूर महापालिका आहे मध्य नागपूर मध्ये जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याकरीता पक्ष संघटना तसेच जनमानसाचे प्रश्न काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सोडवावे असे आव्हान त्यांनी केले.

## कृषी विषयक धोरण व संशोधन यातील समन्वयातून शेतीचा विकास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :




### अजय वीर जाखर यांचे सत्काराला उत्तर

भारत हा कृषिप्रधान देश असूनही या शेतीच्या शाश्वत विकासासाठी पुढील 35 वर्षांत येणाऱ्या समस्या, असणारे शेती विषयक वातावरण व चॅलेंजेसला अनुसरून जी कृषी विषयक धोरणे व संशोधने व्हायला हवीत ती सरकारकडून केल्या जात नाही आहे. भविष्याचा वेध घेणारी कृषी विषयक धोरणे, संशोधन व शेतकरी व सरकार यांच्यातील विश्वास यातूनच भारताची शेती वधारेल असे मत डॉ. सी.डी. मायी कृषी एक्सीलेंस पुरस्कार 2025 चे मानकरी अजय वीर जाखर यांनी सत्काराला उत्तर देताना मांडले.

कृषी क्षेत्रात कार्यरत असणारे ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. सी.डी.मायी यांच्या नावाने कृषी क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्यांना पुरस्कार दिल्या जातो. यावर्षीचा हा पुरस्कार पंजाब मधील मोजगढ येथील प्रगत शेतकरी व भारत कृषक समाजाचे अध्यक्ष अजय वीर जाखर यांना पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते सन्मानपूर्वक देण्यात आला. याप्रसंगी मंचावर कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस कराडचे प्रमुख सल्लागार डॉ. वेद प्रकाश मिश्रा, डॉक्टर सी डी मायी, कृषी विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी, श्रीराम काळे उपस्थित होते.

यावेळी अजय जाखर पुढे म्हणाले की कृषी विषयक धोरणे ठरवितांना शेतकरी आणि सरकार यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण व्हायला हवे. दोघांचाही स्वाभिमान दुखावणार नाही आणि सरकारच्या व शेतकरी यांच्या समन्वयातून शेती विषयक धोरणे निश्चित व्हायला हवी. यावेळी अनिल काकोडकर आपल्या भाषणात म्हणाले की शेती ही संधीही आहे आणि एक समस्या ही आहे. एखादे तंत्रज्ञान ज्याप्रमाणे चांगले किंवा वाईट नसते ते आपल्या विचारांवर अवलंबून असते त्याचप्रमाणे सकारात्मक विचार ठेवून कृषी विषयक धोरणे ठरविली गेली पाहिजे पण भारतात तसे होत्यांना दिसत नाही. यावेळी डॉक्टर वेदप्रकाश मिश्रा यांनी शेती अर्थव्यवस्थेवर प्रकाश झोत टाकला आणि वक्तव्य केले की शेती हा अभिमन्यू प्रमाणे चक्रव्यूहामध्ये अडकला आहे जो त्यातून निघू शकत नाही आहे.

डॉक्टर सी डी मायी हे म्हणाले की, डॉक्टर गिरीश गांधी यांनी माझ्या नावाने पुरस्कार सुरू करून माझा सन्मान वाढविला आहे आणि हा पुरस्कार संपूर्ण भारतभर देण्यात येणार आहे. डॉक्टर गिरीश गांधी यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्य नंतरच्या काळातही पंजाब आणि महाराष्ट्राचे नाते आणि कृषी विकास प्रतिष्ठानच्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वाडीतील अंतर्गत रस्ते खड्डेमुक्त करा

## राकाँचे मुख्याधिकारी यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १५ :

वाडीत सुरू असलेल्या भुमिगत मलवाहिनी कार्य दरम्यान ठेकेदाराच्या दुर्लक्षतेमुळे तसेच पावसामुळे अंतर्गत रस्त्यावर खड्डे पडलेले आहे. ते खराब रस्ते त्वरित दुरुस्त करुन खड्डेमुक्त वाडी तयार करा अशा आशयाचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( शरद पवार गट) उद्योग व्यापारचे प्रदेश उपाध्यक्ष मोहन ठाकरे यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांना देण्यात आले.

वाडी नगर परिषद क्षेत्रात भूमिगत मलवाहिनी निर्माण करताना ठेकेदाराने जे रस्त्याचे विद्रुपीकरण केले आणि कायार्नंतर व्यवस्थितीकरण न केल्याने अनेक ठिकाणी रस्तात असंख्य खड्डे पडले आहे. त्यामुळे वाहनचालक व नागरिकांना प्रचंड त्रासाचा सामना करावा लागत असतानाच. नुकत्याच झालेल्या पावसामुळे या सर्व खड्ड्यात पाणी जमा झाले असल्याने नागरिकांना, वाहनचालकांना चालणे देखील मुश्किल झाले आहे. आपण स्वतः या बाबीचे निरीक्षण केले असल्याचे समजते. आता तर या रस्त्यावरची गिट्टी देखील रस्त्यावर पसरली असल्याने त्रासात वाढ झाली असून छोट्या मोठ्या अपघाताचे प्रमाणही वाढलेले आहे.

खास करून दत्तवाडी येथील मुख्य सैनिकी चौका पर्यंतचा रस्ता अत्यंत विद्रूप झालेला आहे. खड्ड्यात रस्ते की रस्त्यात खड्डे हे समजत नाही ही बाब नगर परिषदेच्या च्या लक्षात असूनही नगर परिषदेने अद्यापही हे खड्डे बुजवण्याची किंवा रस्ता दुरुस्ती करण्याची कारवाई का केली नाही? असा नागरिकांना प्रश्न पडला आहे. आता पाऊस थांबला आहे तरीही नगर परिषदची कार्यवाही काही दिसून येत नाही ही खेदाची बाब म्हणता येईल.

त्यामुळे ताबडतोब युद्ध स्तरावर अंतर्गत रस्त्यात पडलेले खड्डे, पसरलेले गिट्टी वर तातडीने उपाययोजना करून नागरिकांना वाहनचालकांना दिलासा द्यावा. तीन दिवसाच्या आत हि कार्यवाही करावी न झाल्यास पडलेल्या खड्डयात पक्षातर्फे वृक्षरोपण करून नगरपरिषदच्या कार्यप्रणालीचा निषेध नोंदवला जाईल. तसेच दत्ताकॉम्प्लेक्स समोर खड्या मधुन पाणी वाहत आहेत व वाडी परिसरामध्ये अतिक्रमण मधुन येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना त्रास सहन करावा लागत आहेत. असेही निवेदनातुन स्पष्ट केले.

जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर येवले, जिल्हाध्यक्ष सांस्कृतिक विभाग शिवराज सिंह राजकुमार, जिल्हा संघटन सचिव साहेबराव बोवाडे, कार्याध्यक्ष उद्योग व्यापार अशोक पैदलवार, जिल्हाध्यक्ष उद्योग व्यापार अब्दुल रहमान अब्दुल आमीर, माजी प्राचार्य पुरुषोत्तम कोठे, माजी नगरसेवक श्याम मंडपे, मुरली मनोहर मोहता, सुरेश बावनकर, सतीश नवघरे, विप्लब मुजुमदार, डोंगरे उपस्थित होते.

# शाहीर कलाकार मेळाव्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १५ :

शिवशक्ती डहाका मंडळ कांद्री-कन्हान द्वारे गुरुपौर्णिमा, गुरुपुजन कार्यक्रम आणि शाहीर कलाकार मेळावा कार्यक्रमाचे आयोजन शनिवार (दि.१२) जुलै रोजी हनुमान मंदिर देवस्थान खदान रोड कांद्री येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेंद्र भीमराव बावनकुळे, भारतीय कलाकार शाहिर मंडळ ऑल इंडिया यांच्या हस्ते स्व.भीमराव बावनकुळे यांचा प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आणि दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

शाहीर मंडळी व भजन मंडळी यांनी विविध गीत गायन करुन नागरिकांचे मन मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात शाहीर मधुकर शिंदे मेश्राम, शाहीर विक्रम वांढरे, दिलेर पाहुणे, दिपक दहीकर, वैभव मेश्राम, आशिष निंदेकर, हुकुमचंद



ठाकरे, सेवकराम नेवारे, धर्मराज आपुरकर, गिरीधर बावने, शालीकराम शेंडे, प्रफुल भनारे, निलेश वांढरे, गणेश शिंदे मेश्राम, भुपेश बावनकुळे, भोजराज घरझाडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

आरती आणि प्रसाद वाटप करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी पत्रकार रविंन्द्र दुपारे, गजानन वडे, वामन देशमुख, मनोहर सरोदे, हिरामन मदनकर, हिरामण बावनकुळे, देवराव आकरे, वासुदेव आकरे, एकनाथ सरोदे, रामदास शेंडे, ओमप्रकाश भोयर, भाऊराव हिंगे, ब्रम्हाजी नवघरे, श्रीहरी मोहोड, अंबर पाहुणे, विजय चकोले, रामेश्वर उमाटे, प्रकाश पाहुणे, दशरथ पुंडे, राजेंद्र लक्षणे, शिवाजी लक्षणे, भिकाजी गोंडाणे सह आदि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# रुईया हायस्कूलमध्ये लोकशाहीचा जागर

## विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक मोठ्या उत्साहात संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १५ :

लोकशाही सुदृढ करायची असेल तर शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना लोकशाही शिक्षण देण्याची आवश्यकता असते. शालेय शिक्षणात नागरिकशास्त्र शिकवले जाते पण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून नागरिकशास्त्र शिकवण्याचा यशस्वी प्रयोग बनारसीदास रुईया हायस्कूल, काटोल या शाळेने केला आहे. मंगळवारी पार पडलेल्या या निवडणुकीत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदानातून आपले प्रतिनिधी निवडले आहेत. मुलांमधून दिव्यांशू कावरे कॅप्टन व हिमांशू ठाकरे उप कॅप्टन म्हणून तसेच मुलींमधून पलक महल्ले कॅप्टन तर वैष्णवी राऊत उप कॅप्टन म्हणून विजयी झाले. पर्यवेक्षिका श्रीमती रेखा जोगेकर व ज्येष्ठ शिक्षक प्रशांत पिंपळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या निवडणुकीत वर्ग पाचवी ते आठवीच्या एकूण 925 विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक व सचिव प्रकाश नबीरा यांच्यासह संपूर्ण व्यवस्थापन मंडळ तसेच शाळेच्या प्राचार्या वंदना काळे व उपप्राचार्य हेमंत चोपडे यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींचे अभिनंदन केले. शाळेतील शिक्षक निकेश बनसोड यांनी मुलांचे निवडणूक अधिकारी म्हणून तसेच निरुपमा लांडे यांनी मुलींचे निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. तसेच विद्यार्थ्यांना मतपत्रिका देणे, त्यांच्या बोटाला शाई लावणे यांसह मतमोजणी पर्यंतची सर्व प्रक्रिया शिक्षकांनी पार पाडली. ज्यामध्ये श्री. भोजराजन चंदन, नारायण कावडकर, धीरज ढोले, पराग कारंडे, सागर ढोके, अमित कोट्टेवार, प्रवीण चौधरी, विश्वेश्वर कोरडे, कौस्तुभ पवार, हर्षाली थोटे, लीना सावरकर, त्रिशला सलामे, मीनल गिरडकर, शुभांगी गजभिये, रूपाली तायडे, किरण मोरे आदी शिक्षकांसह गोपाल तांबूसकर व लता वानखेडे आदी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत मतदान करता आल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्य रुजविण्यासाठी घेण्यात आलेल्या या निवडणुकीचे निवडणूक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल माननीय तहसीलदार व तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे यावेळी शाळेच्या वतीने विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

# ओसीडब्लू कर्मचाऱ्यांचे आज धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. १५ :

आपल्या विविध मागण्यांसाठी ऑरेंज सिटी वॉटर वर्क्स कंत्राटी कर्मचारी संघाच्या वतीने उद्या बुधवारी संविधान चौकात एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. एकाच संवर्गात काम करणाऱ्या मीटर रिडर कर्मचाऱ्यांना कुणाला जास्त तर कुणाला कमी वेतन देण्यात येते. मागील दहा ते पंधरा वर्षांपासून हे कर्मचारी ओसीडब्लू येथे कार्यरत आहेत. मात्र, त्यांना 13 ते 14 हजार रुपये इतकेच वेतन देण्यात येते. वेतन कमी आणि काम जास्त अशी या कर्मचाऱ्यांची स्थिती आहे. हे कर्मचारी रँड स्टँड कंपनीमार्फत सहा झोनमध्ये कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना मनपाच्या परिमंडळ 1 नुसार कमीतकमी 23 हजार रुपये पगार अपेक्षित आहे. ओसीडब्लूच्या पे रोलवर असलेल्या मीटर रिडर कर्मचाऱ्यांना 24 ते 28 हजार वेतन मिळते. ईतर सुविधा देखील आहेत. कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर अन्याय करण्यात येत आहे.

# विदर्भ अर्बन बँक्स को-ऑप. ची वार्षिक सभा

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. १५ :

विदर्भ अर्बन बँक्स को-ऑपरेटिव्ह असोसिएशनचे अध्यक्ष रविंद्र दूरगकर यांच्या अध्यक्षतेखाली ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. त्यावेळी दूरगकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

आपल्या प्रास्ताविक भाषणात असोसिएशनने विविध उपक्रम राबविले त्यामध्ये नागरी बँकांच्या समस्या मांडुन सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. बँकांच्या संचालकांना प्रशिक्षीत होणे गरजेचे आहे असेही ते म्हणाले. असोसिएशनचे सचिव तुषारकांती डबले, हयांनी चॅटबॉट तसेच नागपूर विद्यापिठ व्दारा करून घ्यावयाचे सभासद बँकांचे विश्लेषनात्मक अभ्यास याची माहिती देउन आपले मनोगत व्यक्त केले. असोसिएशनचे



संस्थापक अध्यक्ष तथा तज्ञ संचालक कैलाशचंद्र अग्रवाल यांनी भाषणात असोसिएशनचे निर्मिती कशी व कशा करिता झाली यांची माहिती दिली.

असोसिएशनचे तज्ञ संचालक संजय भेंडे यांनी आपल्या भाषणात 'सहकार नॉलेज सेंटर' या तंत्र ज्ञान व विकसीत साफ्टवेअरचा विदभार्तील सभासद बँकांच्या उत्कर्षाशासाठी साफ्टवेअर कंपनीला आमंत्रित करून अर्बन सहकारी बँकाकरिता साफ्टवेअर तयार करित आहे. असे आवाहन केले.

असोसिएशन व्दारा प्रणित "सहकार नॉलेज सेंटर" ट्रस्ट फिनटेक लिमिटेड या कंपनी व्दारा कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर हेमंत चाफळे हयांच्या व्दारे असोसिएशन प्रणीत प्रोजेक्टचे डेमो दाखविण्यात आले. हया सभेला २७ विदर्भातील नागरी सहकारी बँकांचे ४३ प्रतिनिधी हजर होते.

# बोरडा येथे धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष शिबिराचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १५ :

आदिवासी जमातीच्या शेवटच्या घटकापर्यंत वयक्तिक लाभ पोहोचविण्याच्या व राज्य सरकारच्या सर्व योजनेबद्दल जनजागृती करण्याच्या मुख्य उद्देशाने गट ग्रामपंचायत बोरडा येथे धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत वेगवेगळे शिबिर आयोजित करण्यात आले. त्यात प्रामुख्याने अन्नपुरवठा विभाग, महसूल विभाग, महिला बालकल्याण विभाग, कृषी विभाग, संजय गांधी योजना तसेच आधार केंद्र विभागाने कामगिरी बजावली.

त्याअनुषंगाने शिबिरात महसूल विभागामार्फत उत्पन्न प्रमाणपत्र, सातबारा व नकाशा वाटप करणे. अन्नपुरवठा विभागामार्फत राशन कार्डवरील नाव कमी करणे, नाव समाविष्ट करणे, दुय्यम शिधापत्रिका वाटप करणे. महिला बालकल्याण विभागामार्फत अमृत आहार, पूरक पोषण आहार, लेक लाडकी योजनेबद्दल माहिती देणे. कृषी विभागामार्फत पिएमएफएमई योजना, पीएम किसान योजना, ॲग्रीस्टॅक योजना याबद्दल माहिती देणे. संजय गांधी विभागामार्फत संजय गांधी योजने श्रावणबाळ योजना यांची माहिती देणे.

आधार केंद्र कडून आधार अपडेटेशन करण्यात आले. यावेळी एकूण ७९ लोकांनी या सर्व योजनांचा लाभ घेतला.

उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन तसेच तहसीलदार रमेश कोळपे यांच्या मार्गदर्शनात पवनी मंडळ अधिकारी राजू लोणकर, खुमारी ग्राम महसूल अधिकारी अनुजा नवनागे,ग्राम विकास अधिकारी पी.एन.चव्हाण यांच्यासह तहसील कार्यालयाचे इतर सर्व कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

# स्कुल व्हॅन व ऑटोरिक्षासाठी प्रमाणपत्र नूतनीकरण

**नागपूर :** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंबंधीच्या स्कूलबस धोरणानुसार महाराष्ट्र शासनाने शालेय विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र मोटार वाहन (स्कुलबस करिता विनियम) नियम, 2011 नियम केले आहे. उक्त नियमांमध्ये वाहनधारक, चालक व शालेय व्यवस्थापन यांच्यावर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसबंधी तरतूद केली आहे.

या तरतुदीच्या अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीच्या दृष्टीकोनातून तसेच जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या निर्देशानुसार स्कूलबस स्कूल व्हॅन व ऑटोरिक्षा नियमित योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने सद्यास्थितीत ज्या स्कुल व्हॅन व ऑटोरिक्षा वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र संपुष्टात आलेले आहे, अशा वाहनधारकांनी स्कुल वाहन व ऑटोरिक्षा योग्यता प्रमाणपत्राचे तातडीने नूतनीकरण करुन घ्यावे. अन्यथा विना वैध योग्यता प्रमाणपत्राशिवाय स्कुल वाहन व ऑटोरिक्षा रस्त्यावर चालतांना तपासणीमध्ये आढळून आल्यास मोटार वाहन कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे परिवहन अधिकारी, नागपूर (शहर) यांनी कळविले आहे.

# मुंबई रोटी फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

## विद्यार्थी व पालकामध्ये आनंद



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १५ :

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रामटेक येथे मुंबईच्या रोटी फाउंडेशन कडुण शालेय विदयार्थ्यांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहावे यासाठी आणि गरजू ग्रामीण विद्यार्थ्यांना न्यूट्रिषीयन, मल्टीव्हिट्यामिन मिळावे यासाठी चिक्की, लाडू, सोनोपापडी, फ्रुटीज, बिसकिटे, सोया मिल्क, मटरी असे खादयपदार्थ दिले.

जेणे करून मुला मुलींचा बौध्दीक व शारीरिक वाढ व विकास व्हावा. यासाठी माजी डिजीपी महाराष्ट्र तथा मुंबई रोटी फाउंडेशनचे संस्थापक एम.आर.डी. शिवनंदन यांच्या कडुण वाटप करण्यात आले.

यावेळी रामटेक येथील राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार आनंदराव देशमुख, सचिव मंयक देशमुख यांच्या सह समस्त संचालक मंडळ, प्राचार्य रवींद्र चन्ने, सर्व शिक्षक शिक्षिका व पालक वर्ग यांनी रोटी फाउंडेशनचे संस्थापक एम.आर.डी. शिवनंदन यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.

# संसद शपथविधी सोहळा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १५ :

स्थानिक भिवापूर महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चालणाऱ्या करिअर कट्टा अंतर्गत करिअर संसद गठित करण्यात आली. या करिअर संसद शपथविधी सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज तर प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाच्या आय.क्यू.ए.सी. च्या समन्वयक डॉ. अनिता महावादीवार, करिअर कट्टाचे आय.ए.एस. आपल्या भेटीलाचे समन्वयक प्रा.डॉ. मोतीराज चव्हाण उद्योजक आपल्या भेटीलाचे समन्वयक प्रा. डॉ. राहील कुरैशी उपस्थित होते.

या करिअर संसदेतील सर्व मंत्र्याना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी शपथ दिली. यामध्ये मुख्यमंत्री म्हणून प्रज्वल शंभरकर, नियोजन मंत्री रीशिका हेडाऊ,कायदे व शिस्त पालन मंत्री रितेश उके, सामान्य प्रशासन मंत्री सेजल बघेल,माहिती व प्रसारण मंत्री अनुष्का कावळे, उद्योजकता विकास मंत्री प्रतिक्षा समरीत, रोजगार स्वयंरोजगार मंत्री मंथन बोध्द, कौशल्य विकास मंत्री प्रणाली रासेकर, महिला व बालकल्याण मंत्री आकांशा कैकाडे यांनी शपथ घेतली. याप्रसंगी सर्व करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते प्रमाणपत्र,नियुक्ती पत्र तसेच माहिती पुस्तिका देवून गौरविण्यात आले.

शपथविधी सोहळा कार्यक्रमाप्रसंगी नवनियुक्त मुख्यमंत्री प्रज्वल शंभरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयमध्ये सुरू असलेल्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने राज्यातल्या निवडक महाविद्यालयांमध्ये भिवापूर महाविद्यालयाला सेंटर ऑफ एक्सलेंन्स मध्ये आणावयाचे आहे. त्याकरिता सर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावे अशा आशावाद त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. राहील कुरैशी यांनी केले.

# आंतर निर्माणी कॅरम स्पर्धेत आयुध निर्माणी अंबाझरीच्या खेळाडूंची पदकांची लयलूट



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १५ :

यंत्र इंडिया लिमिटेड, रक्षा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आयोजित अखिल भारतीय आंतर निर्माणी कॅरम स्पर्धा आयुध निमार्णी दमदम, कोलकाता येथे पार पडली. या स्पर्धेत डिफेन्स (वाडी ) आयुध निर्माणी अंबाझरीच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी करत पदकांची लयलूट केली.

स्पर्धेतील युगल प्रकारात अविनाश साखरे आणि मदन गोंडाने यांनी स्वर्णपदक पटकावले, तर एकल प्रकारात अविनाश साखरे याने रौप्यपदक जिंकले. मिश्र दुहेरी प्रकारात किरण हाडके आणि त्रिवेणी बर्वे यांनी कांस्य पदक मिळवले. तसेच प्रितेश चवरे, महेश घोडे आणि अरविंद पिल्लै यांनीही आपापल्या खेळात उल्लेखनीय कामगिरी बजावली.

खेळाडूंना आयुध निर्माणी अंबाझरीचे उपमहाप्रबंधक गणेश दौंड यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंनी केलेल्या या गौरवशाली कामगिरीबद्दल आयुध निर्माणी अंबाझरीचे कार्यकारी निदेशक अजय येरपुडे यांनी सर्व खेळाडूंना कार्यालयात बोलावून सन्मानित केले.

# तंबाखूची तस्करी करणाऱ्यांना बेड्या

**नागपूर** :तंबाखूची वाहतूक करणाऱ्या आरोपीला वाडी पोलिसांनी अटक करून ५ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अब्दुल गफ्फार अब्दुल जब्बार शेख (५०, रा. कोहळे ले आऊट, दत्तवाडी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ११ जुलै रोजी दुपारी २.३० वाजेच्या सुमारास वाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेश तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक कुणाल धुरट, हवालदार प्रमोद गिरी, प्रमोद सोनवने, हेमराज बेराळ, सतीश येसनकर गस्त घालत होते आसको गोडाऊनजवळ 'खडगाव रोडवर महेंद्रा मॅक्सिमो क्रमांक एम. एच. ४०, वाय-२३०३ च्या चालकाला थांबवून वाहनाची झडती घेतली असता, त्यात शासनाने प्रतिबंधित केलेला ३ लाख ५३ हजार रुपये किमतीचा सुगंधित तंबाखू आढळला.

# अमृत भारत योजनेअंतर्गत नागपूर स्थानक होणार आधुनिक पुनर्विकासाचे आदर्श मॉडेल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील प्रमुख स्थानकांपैकी एक असलेले नागपूर रेल्वे स्थानक अमृत भारत स्थानक योजना अंतर्गत आधुनिकतेकडे वेगाने वाटचाल करत आहे.

आधुनिक पायाभूत सुविधा, उन्नत प्रवासी सोयीसुविधा आणि दिव्यांगांना अनुकूल वैशिष्ट्ये यांच्या आधारे हे स्थानक भारतीय रेल्वेच्या स्मार्ट आणि सर्वसमावेशक पुनर्विकासाचे प्रतीक होणार आहे.

या स्थानकाच्या पुनर्विकासाचे काम वेगात सुरू आहे. लाईन क्रमांक 18 आणि 19 दरम्यान उभारण्यात येणाऱ्या एलिवेटेड कंकोर्सच्या पायाभरणीचे काम पूर्ण



झाले आहे. यामुळे प्रवाशांची वाहतूक अधिक सुलभ आणि स्वतंत्रपणे होणार आहे. जुन्या इमारतींचे पाडकाम, युटिलिटी शिफ्टिंग आणि पूर्व व पश्चिम दिशेला नवीन स्टेशन इमारतींचे काम सुरू आहे. या प्रकल्पाची खासियत म्हणजे ऐतिहासिक इमारतीचे जतन व संवर्धन केले जात आहे. त्या इमारतीचे बाह्य भाग स्वच्छ करून, वॉटरप्रूफिंग, अंतर्गत सजावट व स्थापत्य लाईटिंगद्वारे तिची ओळख जपली जात आहे.

दृष्टीदोष असलेल्या प्रवाशांसाठी टॅक्टाइल पाथचे काम स्थानकावर विविध ठिकाणी सुरू आहे. आधुनिक शौचालये, प्रतीक्षागृहे व लिफ्ट्स यांसह सर्व सुविधा युनिव्हर्सल डिझाईन मानकांनुसार बांधण्यात येत आहेत. स्टेशनमध्ये कलात्मक भित्तिचित्रे, सजावटीच्या भिंती आणि डिजिटल साईनबोर्ड्सद्वारे सौंदर्यवृद्धी केली जात आहे.

नागपूर स्थानकाचा हा पुनर्विकास भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरण, वारसा जतन आणि समावेशकतेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. पूर्णत्वास आल्यानंतर हे स्थानक सर्व प्रवाशांसाठी जगातल्या सर्वोत्कृष्ट सुविधा आणि सुलभ वाहतूक प्रदान करणारे एक मॉडेल स्थानक म्हणून उभे राहील.

